| | |
|---|---|
| | दाखल दिनांकः–०६.०९.२०१८<br>नोंदणी दिनांकः–०६.०९.२०१८<br>घोषीत दिनांकः–०७.०७.२०२६<br>कालावधीः – **०७ १० ०१**<br>वर्ष महिना दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर यांच्या न्यायालयात**
**{पिठासिन अधिकारी सौ.ए.एस. जरुदे}**

**नियमीत फौजदारी खटला क्र.७९/२०१८** **निशानी क्र.५२**
**CNR No.MHCH0070005452018**

महाराष्ट्र सरकार
मार्फत पोलीस अधिकारी,
पोलीस ठाणे, भद्रावती,
तह.भद्रावती, जि.चंद्रपूर **......सरकार पक्ष**

**––विरुध्द––**

०१) **प्रणय उर्फ नागेश रामु केळझरकर**
वय–२८ वर्षे, कामधंदा–मजुरी,
**रा. हनुमान नगर भद्रावती, ता.भद्रावती, जि. चंद्रपुर**

०२) **महेश खुशाल गलांडे,**
वय–२७ वर्षे, कामधंदा–मजुरी,
**रा. शिवाजी नगर भद्रावती,**
**ता.भद्रावती, जि. चंद्रपुर** **.....आरोपी**

**दोषारोप**– कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ भा.दं.वि.,कायदा अंतर्गत

सरकार तर्फे :– श्री.एस.आर.ठावरी, सहा. सरकारी वकील साहेब.
आरोपी क्र.१ व २ तर्फे :– श्रीमती एस.व्ही.खडके, वकील मॅडम.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | **दिनांक १४/०४/२०१८** |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | **दिनांक १४/०४/२०१८** |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | **दिनांक ०६/०९/२०२८** |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge/Particular) | **दिनांक ३०/०१/२०२६** |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of commencement of Evidence) | **दिनांक ०५/०५/२०२६** |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक (Date on which Judgment is reserved) | **दिनांक ०७/०७/२०२६** |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of Judgment) | **दिनांक ०७/०७/२०२६** |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | ---- |

| अ.क्र. (Rank of the accused) | गैरअर्जदारांची नांवे (Name of the Non-applicants) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानीतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of detention undergone during trial for the purpose of Section 428 of Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **प्रणय उर्फ नागेश रामु केळझरकर** | १२/०७/२०१८ | १३/०७/२०१८ | भा.द.वी.चे कलम ३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता. | --- | ---- |
| २. | **महेश खुशाल गलांडे** | २५/०७/२०१८ | २६/०७/२०१८ | भा.द.वी.चे कलम ३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता. | --- | ---- |

## <u>सूची–I</u>

## <u>अर्जदार/गैरअर्जदार/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>

**<u>अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –</u>**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.०१ निशाणी क्र.३२ | **कन्हैया प्रेमसिंग राजपुत** | फिर्यादी |
| साक्षीदार क्र.०२ निशाणी क्र.४५ | **प्रशांत किशोर ठाकरे** | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ––– | ––– | ––– |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –––– | –––– | –––– |

**अर्जदार/गैरअर्जदार/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | **३३** | रिपोर्ट सही पूरता |
| ०२ | **३४** | छापील प्रथम खबर अहवाल सही पूरता |
| ०३ | **३५** | एम.एल.सी सही पूरता |

**ब. बचाव पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –––– | –––– | –––– |

**क. न्यायालय –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –––– | –––– | –––– |

**ड. मुद्देमाल –**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | ––– | –– |

**न्यायनिर्णय**

**(पारीत दिनांक ०७ जुलै,२०२६)**

आरोपींना कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ भारतीय दंड विधान, कायदा अंतर्गत दोषारोपीत करण्यात आले आहे. (यापुढे 'भा.दं.वि.' असे संबोधण्यात

येईल.). अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि. १४/०४/२०१८ सायकांळी साडेसात वाजता फिर्यादी भाजीपाला घेण्याकरीता प्रशांत ठाकरेसह मोटारसायकलने बाजारात गेले व भाजीपाला घेवुन बंगाली कॅम्प येथील कृष्णा मनोरंजन सरकार यांचे घरासमोरील चौकात रात्री आठ वाजताच्या सुमारास मोटारसायकल बाजुला ठेवुन थांबले असताना नागेश केळझरकर व महेश गलांडे हे दोघेही दारु पिउन आले. त्यांनी फिर्यादीला तुम्ही विक्की बांगर यांचे टॅक्टरवर कावुन जाता असे म्हणून त्यांचेशी झगडा भांडण करुन शिवीगाळ केली. नागेश केळझरकर याने हातातील कोणत्यातरी लोखंडी वस्तुने फिर्यादीचे उजव्या डोळयाचे वर कपाळावर व उजव्या डोळयाचे खाली मारुन जखमी केले. महेश गलांडे याने प्रशांत ठाकरे यास हाथाबुक्याने मारपीट केली व मारण्याची धमकी दिली. अशा आशयाची फिर्याद फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला दिली.

०२. सदर फिर्यादवरुन आरोपीं विरुध्द गुन्हा क्र.२३०/२०१८, कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ भा.दं.वि., कायदा अंतर्गत दाखल करण्यात आला.

०३. सहा.फौजदार स्वप्नील इनमुलवार यांनी तपासाच्या अनुषंगाने घटनास्थळ पंचनामा तयार केला. आरोपीचा कबुलीजबाबत नोंदविला, प्रकरणात वापरण्यात आलेले हत्यार एक लोखंडी गोल सळाक जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला, आरोपींना अटक केली, साक्षीदारांचे बयाण नोंदविले, जखमीचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला. व तपासाअंती कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ भा.दं.वि.,कायदा अंतर्गत दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

०४. आरोपीं विरुध्द निशाणी क्र.२८ वर कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ भा.दं.वि.,कायदा अंतर्गत शिक्षापात्र अपराधाकरीता दोषारोप निश्चीत केले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. त्यावर आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली.

०५. अभिलेखावर उपलब्ध पुरावा बघता माझे समक्ष निर्णयासाठी उपस्थित मुद्दे व त्यावरील माझा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.१४/०४/२०१८ रोजी हनुमान नगर भद्रावती येथे आरोपींनी समान उद्देशाने लोखंडी सळाक याने फिर्यादीला व प्रशांत ठाकरे याला हाताबुक्याने मारहाण करुन इच्छापुर्वक साध्या स्वरुपाची दुखापत पोहचवली, तसेच सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने फिर्यादीस प्रक्षोभित केले व फिर्यादीस तसेच प्रशांत ठाकरे यास भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने धमकी दिली, व अशा प्रकारे आरोपींनी शिक्षापात्र अपराध केला ? | **सिध्द केले नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अभियोग पक्षाने आरोंपीवरील गुन्हा सिध्द करण्याकामी एकूण २ साक्षीदार तपासले आहे. सा.क्र.१ **कन्हैया प्रेमसींग राजपुत** यांना फिर्यादी म्हणून नि.क्र.३२ वर, सा.क्र.२ प्रशांत किशोर ठाकरे यांना जखमी साक्षीदार म्हणून नि.क्र.४५ वर तपासले आहे. त्यापुर्वी फिर्यादी व आरोपींनी नि.क्र. ३६ अनव्ये संयुक्त पुरसीस दाखल करुन त्यांचे आपसात मिटले आहे व फिर्यादीला कुठलेही साक्षीदार तपासले नसल्याचे कथन केले. आरोपींनी अभिलेखावर असलेले संपुर्ण दस्तऐवज मान्य केले. त्यानंतर सरकार पक्षाने नि.क्र.४६ वर पुरशिस दाखल करुन पुरावा बंद केला.

०७. अभिलेखावर आरोपीं विरुध्द सबळ पुरावा नसल्यामुळे आरोपीचे बयाण कलम ३१३ फौजदारी प्रक्रीया संहिता अन्वये नोंदविण्यात आले नाही.

### <u>मुद्दे क्र.१ व २ करीताः–</u>

०८. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.१ कन्हैया प्रेमसींग राजपुत यांना जखमी व फिर्यादी म्हणून तपासले असता त्यांनी साक्षेदरम्यान आरोपींना ओळखत असल्याचे, ते त्यांचे मित्र असत्याचे, घटना हि मागच्या वर्षी हनुमान मंदिराजवळ बंगाली कॅम्प् भद्रावती येथे सकाळी दहा वाजता घडल्याची व त्यावेळी आरोपी कुठे होते ते त्याला माहित नसल्याचे कथन केले. त्यांनी फिर्याद व प्रथम छापील खबर अहवाल यावर सही

असल्याचे परंतू मजकुर माहित नसल्याचे कथन केले. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी दि. १४/०४/२०१८ रोजी सायंकाळी सात वाजतेच्या दरम्यान ते भाजीपाला घेण्याकरीता प्रशांत ठाकरे यांचेसोबत मोटर सायकलने गेल्याचे व परत आल्यानंतर कृष्णा सरकारचे घरासमोरील रस्त्यावर थांबले असता आरोपी दोघेही दारु पिउन आल्याचे व विक्की बांगर यांचे ट्रॅक्टरवर कावून जाता या कारणावरुन त्यांचेशी भांडण करुन शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ ने लोखंडी वस्तुने उजव्या डोळयाच्या खाली व कपाळावर मारहाण केल्याचे तसेच आरोपी क्र. २ यांनी त्यांच्या मित्राला हाताबुक्याने मारहाण केल्याचे व मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले. पुढे त्यांनी आरोपीसोबत त्यांचा आपसी समझोता झाल्याचे कथन केले.

०९. सा.क्र. २ प्रशांत किशोर ठाकरे याने साक्षेदरम्यान आरोपींना ओळखत असल्याचे तसेच फिर्यादीलादेखील ओळखत असल्याचे कथन केले पुढे त्यांनी घटना किती वर्षापुर्वी ची, कधी,कुठे व काय घडली हे माहित नसल्याचे कथन केले. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान दि. १४/०४/२०१८ रोजी सायंकाळी साडेसात वाजता फिर्यादीसोबत भाजीपाला घेवुन कृष्णा सरकार यांचे घराजवळील चौकात आल्याचे व मोटारसायकल बाजुला करुन तिथे थांबल्याचे व दोघेही आरोपी दारुच्या नशेत तिथे आल्याचे व विक्की बांगर याच्या टॅक्टरवर का बर जाता असे म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीला त्याचे डोक्याचे वर कपाळावर व डोळ्याचे खाली लोखंडी सळाकने मारल्याचे तसेच आरोपी क्र. २ याने त्यांना हाताबुक्याने मारहाण करुन दोघांनाही मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले. पुढे त्यांनी हे देखील मान्य केले कि त्यांच्यात व आरोपीमध्ये समझोता झाला आहे.

१०. वरील फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी यांनी फिर्याद आणि प्रथम छापील खबर अहवाल यावरील केवळ सही ओळखली परंतु मजकुराबाबत अनभिन्न्ता दाखविली व त्यास आरोपी क्र. १ ने लोखंडी सळाकीने मारल्याची बाब नाकारली व अभियोग पक्षास सहाकार्य केले नाही. तसेच सा.क्र. २ यांनी देखील अभियोग पक्षास सहकार्य केले नाही व आरोपी क्र. २ यांनी त्यांना हाताबुक्याने मारहाण केल्याची बाब नाकारली.

११. सदर घटनेत फिर्यादी हे जख्मी पिडीत असल्यामुळे त्यांनी अभियोग पक्षास

सहकार्य करणे अपेक्षीत होते, परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सरकारपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासादरम्यान त्यांनी असे देखील मान्य केले की, त्यांच्यात समझोता झाला आहे. त्याअनुषंगाने फिर्यादीने व आरोपींनी एकत्रीत पुरशिस दाखल करुन त्यांना इतर कोणालाही तपासावयाचे नसल्याचे तसेच त्यांच्यात आणि आरोपीमध्ये आपसात तडजोड झाली असल्याचे कथन केले तसेच सा.क्र. २ यांनी देखील जखमी असुन आरोपी क्र. २ ने त्यांना हाताबुक्यांनी मारहाण केल्याबाबत काहीही कथन केले नाही. तसेच फिर्यादी व आरोपींनी दाखल केलेली संयुक्त पुरसीस यावरुन फिर्यादीला व जखमीला सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही, असे प्रकर्षाने दिसुन येते.

१२. आरोपी वरील दोषारोपीत गुन्हा पुर्णपणे व निःसंशय सिध्द करण्याची जबाबदारी ही सरकार पक्षाची असते. त्या अनुषंगाने सरकार पक्षाच्या वतीने घेतलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र.०१ (कन्हैया प्रेमसींग राजपुत) हे स्वतः जख्मी फिर्यादी आहेत. परंतु, त्यांनी सरकार पक्षास सहकार्य केले नाही. त्यांनी त्यांच्या साक्षेत आरोपीविरुध्द काहीही कथन केले नाही. तसेच जखमी साक्षदार यांनी देखील अभियोग पक्षास सहकार्य केले नाही व आरोपींनी त्यांना मारहाण केल्याचे कथन नाकारले. करीता दोन्ही साक्षीदाराची साक्ष काही एक उपयोगाची नाही. वास्तविक पाहता सदरच्या घटनेत फिर्यादीच्या, फिर्याद वरुनच आरोपींना दोषारोपीत करण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी त्यांची बाजू खंबीरपणे मांडणे अपेक्षीत होते. परंतु, त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. आरोपींनी अभिलेखावरील संबंधीत सर्व दस्तऐवज मान्य केले, परंतु, तसे असून देखील आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप सबळ पुराव्या अभावी सिध्द होत नाहीत. तसेच अभिलेखावर दाखल पुरसीस नि.क्र.३६ प्रमाणे फिर्यादीला आरोपी विरुध्द प्रकरण पुढे चालवायचे नाही, असे प्रकर्षाने दिसून येते.

१३. उपलब्ध पुरावा व वरील सर्व बाबींचा विचार करता, मी या निष्कर्षापर्यंत आली आहे की, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीस लोखंडी सळाक याने त्यांचे उजव्या डोळयाचे वर कपाळावर व उजव्या डोळयचे खाली मारले, तसेच प्रशांत ठाकरे यास हाताबुक्याने मारहाण केली व इच्छापुर्वक दुखापत पोहचविली तसेच फिर्यादीला त्यांच्या हातुन अपराध घडावा या उद्देशाने प्रक्षोभित केले व फौजदारी पात्र धापदपटशा केला, हे

दर्शविणारा तिळमात्रही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. करीता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परिणामी, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ साठी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी **क्र.१. प्रणय उर्फ नागेश रामु केळझरकर,** रा. हनुमान नगर भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपुर, आरोपी क्र. २ **महेश खुशाल गलांडे**, रा. शिवाजी नगर भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपुर यांची कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातून, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| ०२. | आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/–चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा. |
| ०३. | जप्त लोखंडी सळाख याची अपील कालावधीनंतर कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी. |
| ०४. | न्यायनिर्णय आरोपी, आरोपीचे वकील आणि सरकारी वकील यांच्या समक्ष घोषीत. |

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.07.07 17:05:24 +0530

ठिकाणः भद्रावती
दिनांकः– ०७.०७.२०२६.

**(ए.एस. जरुदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर